# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २०/०७/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## खून

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक २०/०७/२०२२ चे सकाळी ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ सुगंधा विश्वनाथ गजघाटे वय ४८ वर्ष, रा.तातोली ता.भिवापुर या धानाचे रोहण्याकरीता गावातील मेटकर कुशनकर मेश्राम यांचे गुत्यामध्ये मेढा येथे गेली होती. त्यांचा मुलगा नामे– विशाल विश्वनाथ गजघाटे (मृतक), वय २५ वर्ष, रा.तातोली ता.भिवापुर हा घरी होता. दुपारी अंदाजे १२.०० वा. सुमारास राष्ट्रपाल याचा फोन कुशनराव यांचे जावई शेखर यांच्या फोन वर आला. तेव्हा शेखर फिर्यादी सोबत शेतात काम करीत होता. राष्ट्रपाल याने सांगितले की, 'विशाल याचा घरी खून झाला आहे, तुम्ही घरी जा' यावरून फिर्यादी या आरडा ओरड करीत शेतमालक यांचे मोटरसायकलने तातोली येथे घरी आली. तेव्हा तिला तिचे घरा समोर तिचा मुलगा विशाल विश्वनाथ गजघाटे हा पडलेला दिसला. त्याचे मानेला खोल जखमी होत्या व तो मरण पावलेला होता. दिनांक २०/०७/२०२२ चे सकाळी ११.३० वा. ते १२.३० वा. दरम्यान मौजा तातोली शिवार येथे फिर्यादीचा मुलगा नामे– विशाल विश्वनाथ गजघाटे (मृतक), वय २५ वर्ष, रा.तातोली ता.भिवापुर यास आरोपी नामे– सुरज शालीक कामडी वय २३ वर्ष, रा.तातोली ता.भिवापुर याने 'माझे आईचे सोबत तुझे संबध आहे' असे पाप लावत असल्याने याकारणाने आरोपीने विशाल गजघाटे यास कुऱ्हाडीने मानेवर व डोक्यावर मारुन जिवानिशी ठार केले. तसेच आरोपीने मृतक सोबत याच कारणावरून मागील वर्षी भांडण केला होता व जिवाने मारण्याची धमकी दिली होती.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री महेश भोरटेकर मो.क्र ९५११८४३३७० हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील मौजा सावनेर डवले ज्वेलर्स दुकानाचे समोर सावनेर येथे दिनांक १९/०७/२०२२ चे १३.३० वा. चे पुर्वी फिर्यादीचा चुलत काका **रामचरण गुलाब वाघाडे(मृतक) वय ६० वर्ष रा. रेल्वे स्टेशन रोडचे उडान पूलाचे खाली सावनेर** यांना दारू पिण्याची जास्त सवय असल्याने दारूचे जास्त प्रमाण प्राशन केल्याने त्यांची प्रकृती खराब झाल्याने डवले ज्वेलर्स दुकानाचे समोर रोड चे बाजूला मरण पावलेले दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. अंजली कृणाल वाघाडे, वय २० वर्ष, रा. रेल्वे स्टेशन रोड, सावजी चाळ सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार राजेंद्र यादव मो.क्र. ८८८८२१३९३ हे करीत आहे.

२) <u>पो.स्टे. नरखेड</u> :— अंतर्गत मौजा खेडी खुर्द येथे दिनांक १८/०७/२०२२ चे १२.०० वा. दिनांक १९/०७/२०२२ चे १५.०० वा. सुमारास **चंद्रभान गोपाळराव गजभिये (मृतक), वय ६५ वर्ष रा. येरला पावडे ता. नरखेड** हे येरला पावडे गावाजवळील जिवना नदिच्या पूरात वाहुन गेले होते. दि १९/०७/२०२२ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीत खेडी खुर्द गावाजवळील नदित मृत अवस्थेत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रोशन चंद्रभान गजभिये, वय ४० वर्ष रा येरला पावडे ता नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक गजानन शेंडे मो.क्र. ८८३०१०७६३३ हे करीत आहे.

३) <u>पो.स्टे. बोरी</u> :— अंतर्गत मौजा जांभळापाणी नाला ते गरमपुर शिवार सुगन नाला येथे दिनांक १७/०७/२०२२ चे ०२.०० वा. दिनांक १९/०७/२०२२ चे सुमारास फिर्यादी याचा लहाण भाउ नामे अमीत **जगदीश पोहणकर(मृतक), वय २८ वर्ष रा. खैरीबुटी ता.उमरेड जि.नागपुर** हा कामाला सुट्टी असल्याने आपल्या गावी खैरीबुटी येथे मोटारसायकलने येत आहो असे फिर्यादीला सांगुन जाण्याकरिता निघाला. परंतु घरी न पोहचल्याने फिर्यादीने पोस्टे बोरी येथे दि. १८/०७/२०२२ रोजी ४१/२२ प्रमाणे मिसिंग दाखल केली होती. घटना.ता.वेळी व ठिकाणी यातिल मृतक हा पाण्याच्या प्रवाहाने वाहुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेषराव जगदीश पोहणकर वय ३५ वर्ष रा. .खैरीबुटी ता.उमरेड जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार धवराळ मो नं. ९७६५४९७००५ हे करीत आहे.

४) <u>पो.स्टे. जलालखेडा</u> :— अंतर्गत वाढोणा येथे दिनांक १६/०७/२०२२ चे २१.०० वा. सुमारास **रविंद्र पाडुरंग सातपुते वय ३० वर्ष रा. वाढोणा** याने आपले राहते घरी दारू पिवुन दारूच्या नशेत विषारी कीटक नाशक औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारकामी प्रथम सरकारी दवाखाना मेढंला नंतर नागपूर मेडीकल कॉलेज येथे दि १७/०७/२२ चे ०४.०० वा. भरती केले असता उपचारा दरम्यान डाक्टरांनी त्यास तपासुन दि १७/०७/२२ चे ०५.०० वा. मृत घोषित केले. मेडीकल कॉलेज नागपुर येथुन ००/२२ मर्ग ची डायरी प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धोंडे मो.न. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर